**प्रेसनोट** **दि.१८/०५/२०१९**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वाट चुकलेल्या आजोबांना पोलीसांचा आधार

अहो,साहेब माझा मुलगा धनकवडी मध्ये राहतो मला काय त्याचे घर सापडत नाही जरा सोडता काही आर्त हाक आहे एका वयोवृध्द नागरिकाची. दि.१७/०५/२०१९ रोजी दुपारी भर ऊन्हात ०३/०० ते ०३/३० वाजण्याच्या सुमारास एक ६५ वर्षाचे वयोवृध्द गृहस्थ रा.खेड जि.पुणे हे म्हात्रे पुलाच्या नदी पात्रातुन चालत चालत झोपडपट्टी मध्ये आले त्यांच्या पायात चप्पल नव्हती पाय भाजत होते अशा अवस्थेत त्यांना तहान लागली होती व पोटात अन्नाचा कण नसल्यामुळे बोलण्याची ताकद सुध्दा नव्हती अशा परिस्थिती मध्ये ते दत्तवाडी दर्गा पर्यंत चालत आले व त्याठिकाणी सध्या रमजान महिन्याचा मुस्लिम बांधवांचा उपवास चालु असल्याने पोलीस कर्मचारी बंदोबस्त साठी तैनात होते. त्यामध्ये महिला पोलीस कॉन्स्टेबल कृतिका शेंडे या उपस्थित होत्या त्यांना हे आजोबा भेटले व म्हणाले कि, “मी चासकमान वरुन आलो आहे माझा मुलगा धनकवडी मध्ये राहतो त्याचे इस्त्रीचे दुकान आहे पण मला कसे जायचे हे समजत नाही मी वाट चुकलो आहे. मला तेवढ मुलापर्यंत सोडवा.” असे सांगितल्यावर त्यांना प्रथम पाणी देऊन काही वेळाने चहा बिस्कीट खाण्यास दिल्यावर ते थोडे तरतरीत झाले.

काही वेळाने दत्तवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक सतिश भालेकर, बिट मार्शल पोलीस कॉन्स्टेबल अमोल झणझणे व पोलीस कॉन्स्टेबल चेतन गद्रे यांच्यासह त्यांना धनकवडी येथे विविध भागात फिरुन त्यांचा मुलगा सोमनाथ शिंदे यांचा ३७/१ फाईव्ह स्टार सोसायटी धनकवडी हा पत्ता शोधुन त्यांचा नातु विशाल सोमनाथ शिंदे यांच्या ताब्यात दिले. या प्रसंगी विशाल शिंदे यांनी पोलीसांना आपल्या आजोबांना सुखरुप आणुन सोडल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

